म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २३४८



REFBK-0022335
REFBK-0022335

# ओळी

प्रदीप गोखले

काव्य
संदर्भ
22335
29/9/08
2376

# - ओळी -

प्रदीप गोखले

REFBK-0022335
REFBK-0022335

अभिनव प्रकाशन, मुंबई १४.

किमत पाच रुपये

प्रकाशक :

वामन विष्णु भट
**अभिनव प्रकाशन,**
५३, गुरु नानक मार्केट, डॉ. आंबेडकर रोड,
दादर, मुंबई १४

© प्रदीप गोखले

प्रथमावृत्ती : जानेवारी १९७७

मुखपृष्ठ : सुहास बहुळकर

मुद्रक :

श्री. श्री. द. पराडकर,
**वैभव प्रेस,**
' मोती निवास ', शुक्रवार पेठ, फलटण.

# ओळीपूर्वीचा स्वल्पविराम

माझा योगायोगावर फार विश्वास आहे. प्रदीप गोखलेंशी माझी ओळख अशीच योगायोगाने झाली. पण त्यांची ओळख होण्याच्या अगोदर योगायोग त्यांच्या कवितांची ओळख होण्याचा होता. त्यांच्या कवितांच्या वहीने माझी त्यांची ओळख घडवून आणली.

त्यावेळी मी पुणे विद्यापीठ विद्यार्थी वसतिगृहाचा प्रमुख होतो. गोखले त्या वसतीगृहातच रहात होते. ते संस्कृत एम. ए. चा अभ्यास करीत होते. मी त्यांना त्यावेळी कदाचित पाहिले असेल पण फारसे बोलण्याचा प्रसंग तेव्हा कधी आला नाही. अचानक एक दिवस बातमी पसरली की, गोखल्यांचा वसतिगृहात पत्ता नाही. त्यांना सर्वसंगपरित्याग करण्याची सुबुद्धी झाली होती. त्यांची एक चिठ्ठी सापडली. 'माझा शोध करू नका.' असे काहीतरी त्यात होते. अधिक चौकशीअंती असे समजले की, गोखले थोडेसे वेडसरच होते. त्यांचा वेडसरपणा अलौकिक होता, हे कळायला मला फार वेळ लागला. त्यांचे सोबती म्हणू लागले, हा वेडा पीर रात्र रात्र आकाशाकडे पहात असे. त्याच वेळेला आम्हाला वाटले की, हा काहीतरी बरे-वाईट करणार. कोणी म्हणाले, "गोखलेंनी आपल्या जिवाचाही सोक्ष-मोक्ष केला असेल." तो हिमालयात जाऊन साधू झाला असे आणखी काही लोकांचे मत होते. गोखलेंचा जेव्हा तपास लागेना तेव्हा त्यांच्या आई वडिलांना बोलावणे भाग पडले. त्यांच्या देखत गोखलेंचे सामान सुमान एकत्र करताना त्यांची कवितांची वही माझ्या हाती लागली. ती मी माझ्याजवळ ठेवून घेतली. त्यांच्या आई वडिलांनीही राहून दिली. त्यामुळे त्यांच्या कविता वाचता आल्या. प्रस्तुत संग्रहात त्या कवितांपैकी थोड्याफार तरी कविता असाव्यात. ज्या चमत्कारिक पद्धतीने गोखले वसतिगृहातून गुप्त झाले, त्याच चमत्कारिक पद्धतीने गोखले एक दिवस विद्यापीठात परत अवतीर्ण झाले. आता त्याचे वडील त्यांना घरीच ठेवून घेणार होते. पण आपली कवितांची वही मिळविण्यासाठी

एक दिवस गोखलेंची स्वारी माझ्याकडे आली. माझे त्यांचे थोडेसे बोलणेही झाले. त्या काळात गोखले फार कमी बोलत. कशीबशी माझ्याकडून कवितांची वही हस्तगत करून स्वारीने जणू पोबाराच केला. मी म्हणालो होतो, "वही माझ्याजवळ असू द्या. जमले तर आपण त्या प्रसिद्ध करू." गोखलेंनी नुसताच हुंकार दिला होता. पुढे अनेक महिन्यांनी ही स्वारी अचानक माझ्याकडे आली आणि "कविता प्रसिद्ध करावयाला आपली हरकत नाही" असे सांगू लागली, पण कविता पुस्तकरूपाने प्रसिद्ध करणे हे इतके क्षुल्लक काम नाही. कोणीही प्रकाशक कवितांचे पुस्तक प्रसिद्ध करण्यास भाव घेतच असतो. पण सामान्य प्रकाशक जी गोष्ट करण्यास धजत नाहीत तेथे मुसंडी मारण्यास आमचे वामनराव भट तयारच असतात. मी त्यांना या कवितांबद्दल विचारताच त्यांनी पहातो म्हणून सांगितले, वही ठेवून घेतली आणि आठच दिवसात कविता प्रसिद्ध करण्याचा निर्णय घेतला. मग गोखले मुद्रणप्रत करण्यास बसले. त्यामुळेच मूळच्या कवितांतून काही कविता वगळल्या गेल्या असाव्यात.

तसे पाहिल्यास मी काही काव्यसमीक्षक नव्हे. चांगले काव्य कोणते हे कदाचित मला समजतही नसेल. पण कविता वाचनाची मला आवड आहे आणि मला कविता आवडतात सुद्धा. तेव्हा मला कविता का आवडतात याच्या संबंधी विचार करण्याचा मला हक्कही पोहोचतो. जर मला गोखल्यांच्या कविता आवडल्या असतील, आणि त्यातील 'भावना' कळली नसेल तरी सुद्धा आवडण्याकरिता भावनांची कास धरण्याचे कारण असू नये.

गोखल्यांच्या कविता मला का आवडल्या ? कदाचित त्यात भावनामय अनुभव असेल. कदाचित भावनांचा आविष्कार पण असेल. पण माझ्यापुरतेच बोलावयाचे झाल्यास त्या मला आवडल्या तेव्हा त्यातील भावनांचे वहीखाते मी उघडले नव्हते. त्यांच्या कविता माझ्या मनाला निश्चित चाटून गेल्या पण त्यांनी आवाहन केले ते केवळ माझ्या भावनांना नव्हे. मला वाटते त्या कवितांतील बौद्धिक चमत्कारांनी पण मला मोहित केले, आकृष्ट केले. उदाहरणार्थ हीच कविता पहा –

> "मरणावर कितीही कविता केल्या
> तरी त्या मरेपर्यंत अपुऱ्या असतात.

जीवनावर काहीही लिहिलं नाही
तरी जगल्यानंतर ते पुरेसे असते."

या ओळीत खरोखर आहे विसंवाद किंवा मर्ढेकरांच्या भाषेत सांगावयाचे झाल्यास विरोध. त्यामुळेच चटकन चमत्कार निर्माण होतो. या चमत्काराची पुसटशी का होईना पण जाणीव होणे म्हणजे काव्य आवडणे. यात भावना पहावयास गेल्यास भावना कदाचित आपल्या हातातून निसटू पहातील. कवितांत लॉजिक नसते. पण लॉजिकच्या शिवाय जे काही असते त्यांना प्रत्येकदा भावना म्हणावं असं मात्र मला वाटत नाही. त्यांची 'ख्रिस मस' ही कविताही अशीच.

"बा परमेश्वरा ! त्या येशूला क्षमा कर.
तू दयाळू आहेस हा त्याचा भ्रम होता.
तुझ्या नैसर्गिक क्रौर्यावर त्याने आघात केला.
रक्ताळलेली अनेक प्रेते भूमीखाली दडत आहेत."

या ओळी निश्चितच आपला ठाव घेतात पण तो हृदयाचा नव्हे. त्याने जीवन हे तर्कशास्त्रापेक्षा अधिक व्यापक आहे एवढेच कळते. आपल्याला जाणीव होते ती हॅम्लेटच्या वाक्याची –

"There are more things in heaven and earth, Horatio, than are dremt in your philosophy."

या जाणिवेपायीच आपल्याला, आपल्या सामान्य बुद्धीला न कळ–णारा असा अर्थही –

"भगवत्गीतेतील एकेका अक्षरागणिक
ज्याने एकेक शरीर नष्ट केले
त्या थोर दयाघन परमेश्वरा, त्या येशूला क्षमा कर."

या ओळीत दिसावयास लागतो. सामान्य शब्दांतून सामान्य माण-साला जो अर्थ प्रतीत होतो त्यापेक्षा वेगळा अर्थ प्रतीत होणे हे काव्याचे कार्य असते असे मला वाटते. या आगळ्या अर्थातूनच गोखलेंच्या कवितांची-

"ही पाउलवाट न्यारी, आभाळाला जाते
पण चारपाचच चांदण्या घेऊन येते."

या पाउलवाटेसंगे जर कुणाला जाता आले तर कविता सार्थक

झाली म्हणावयास हरकत नाही. यालाच काही लोक कदाचित भावना म्हणतील. म्हणोत बिचारे! मला तसे वाटत नाही.

पुष्कळ वेळा आपण एखादे स्पष्टीकरण व्यवस्थित न देता आले म्हणजे भावनांना हाती धरत असतो. भावना म्हणजे जणू काही "लालबुंद मदिरेने लाललाल झालेले मन" अशा गैरसमजात आणि थाटात मग–

"माझ्या छोटयाशा घरात मदिरेचे सडासारवण होउ दे
माझ्या छोटयाशा घराचा मला उमरखय्याम होउ दे."

अशासारख्या ओळी केवळ स्फुरतच नाहीत तर त्या ओळीतही भावना दिसायला लागतात.

जुन्या संस्कृत अलंकारिकांनी अलंकार म्हणजे चमत्कृती 'चमत्कृतिश्च अलंकार:' असे म्हटले आहे. चमत्कृती म्हणजेच काव्य असे मला वाटते. मग ती भावनांची असो, बुद्धीची असो की आणखी कशाची असो. या चमत्कृतीत मला काव्य दिसते, काव्यसमाधान मिळते. अर्थातच

"आमच्या पायांना डोळे फुटले
तेव्हा पृथ्वीच्या आणि पार्थिवतेच्याही आरपार जाऊन आलो."

या ओळीत मला काव्य दिसते.

काव्य म्हणजे ते की ज्यामुळे आमच्या पायांनाही कधी कधी डोळे फुटतात असे म्हणता यावे.

"अर्थापासून दूर जाणाऱ्या शब्दांकडून काही शिकण्यासारखं असतं."

कदाचित शिकण्यासारखी असणारी ही गोष्ट म्हणजे निराळ्या प्रकारचा अर्थ असावा. हा निराळ्या प्रकारचा अर्थ उत्पन्न करण्याची ताकद ज्या शब्दांत असते त्याचे नाव काव्य.

गोखल्यांच्या कवितेत भावनामय अनुभव किती आहे याचा पाढा मी वाचीत बसत नाही. भावनामय अनुभव सुखद असला तरी काव्याचे मोठेपण हे सर्वस्वी त्या अनुभवावर अवलंबून असत नाही असे मला वाटते. कवी शेवटी जगातूनच अनुभवांचे कण साठवूनच कविता – कला निर्माण करीत असतो पण या कणांत ज्या प्रमाणात जगाचे रूप परावर्तित करण्याची शक्ती असते त्या प्रमाणात काव्य किंवा कला महान होते. Comprehention-

व्यापकता – हा सुद्धा काव्याचा एक मोठा गुण असतो असे मी समजतो. या गुणांमुळे काव्य समृद्ध होते, काव्यात वैपुल्य येते.

काव्य जसे केवळ भावनेवरच अवलंबून असत नाही तसेच काव्याला एकच एक असे तत्त्वज्ञान असते असे पण दिसत नाहीं. एकच कवी दोन भिन्न तत्त्वज्ञानांशी संबद्ध असणारीं काव्ये करू शकतो. कवीचा अनुभव जितका व्यापक, पक्व त्या प्रमाणात हे घडते. त्यातूनच कवीची शब्दसंपदा निर्माण होते, त्याची उपमा रुपके निर्माण होतात, त्याचा आशय निर्माण होतो आणि त्यातून निर्माण होणारी अर्थसंपदा वाचकांच्या मनाचा, बुद्धीचा ठाव घेते. गोखल्यांच्या काव्यात हे सर्व गुण मला दिसतात –

"मन मसणात माझ्या थडग्यांची सुटली पोटे."

असे म्हणणारे गोखले त्यामुळेच,

"गाढ तुझ्या वक्षावरती दोन चंद्र बहकले होते.
त्यांना स्पर्शण्यापूर्वीच माझे हात अनंतात पोहोचले होते."

असे म्हणू शकतात. गोखल्यांच्या वरील ओळीत जर गोखले पहिल्या ओळीवरच थांबले असते तर त्यांना भावनामय अनुभवांचा आस्वाद आपल्या वाचकांना द्यायचा होता असे म्हणता आले असते. पण त्यांच्या काव्यात जो चमत्कार आहे तो कळतो –

"त्यांना स्पर्शण्यापूर्वीच माझे हात अनंतात पोहोचले होते." या ओळीनी गोखल्यांच्या सर्वच कवितांबद्दल या प्रकारचे भाष्य करता येईल.

गोखले आपल्या कवितांना ओळी म्हणतात. अर्थात त्या शब्दांच्या ओळी आहेत. काव्यामध्ये मनातील भावांना शब्दांकितच करावयाचे असते. काव्य या ओळीत बद्ध केले जाते. त्यामुळेच या शब्दांमध्ये - या ओळींमध्ये कवीला अभीप्रेत असलेला किंवा नसलेलाही अर्थ निर्माण करण्याची शक्ती आहे किंवा नाही. तसेच हा अर्थ चमत्कृती निर्माण करणारा आहे की नाही हे ठरावे. काव्याचे काव्यत्व ठरविण्याचे गमक म्हणजे त्यात चमत्कृतीची पेरणी कशी व किती झाली आहे हे. कमीत कमी माझ्यापुरते तरी हे गमक श्री. गोखले यांच्या कवितांच्या संदर्भात यशस्वी झाले आणि त्यामुळेच गोखले यांच्या कविता मला आवडल्या असे मला म्हणता आले.

अर्थात मला आवडू शकणाऱ्या कविता इतरांना आवडू शकतात

असे वाटते. कवितांच्या - शब्दांच्या सामर्थ्यावरच असे संप्रेषण अवलंबून राहील. मला वाटते की एका माणसाच्या आवडीपासून अनेक माणसांच्या आवडीपर्यंत जेव्हा आपण मार्ग आक्रमू लागतो तेव्हा त्या कवितेबद्दल केवळ 'ती मला आवडली' असे न म्हणता 'ती सुंदर आहे' असे पण म्हणता यावे. प्रदीप गोखले यांच्या कवितेबद्दल केवळ मलाच नाही तर इतरांनाही असे म्हणता येईल असे वाटते.

काव्यावर लिहिण्याचा माझा अधिकार नाही. पण गोखलेंनी केलेली विनंतीही अमान्य करता येणे शक्य नाही. या अगतीकतेमुळेंच हे चार शब्द लिहिण्याचा खटाटोप "ओळीपूर्वीचा स्वल्पविराम........"

– **सुरेंद्र बारलिंगे**

---

# शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ३ (प्रस्तावना) | वरून ६ वी | आविष्कारण | आविष्करण |
| २१ | खालून ८ वी | तुझ्याकडे | तुझ्या |
| २४ | वरून ५ वी | 'नवीन दिवसाला.....' येथपासून नवीन अल्पकविता सुरू होते असे समजावे | |
| २९ | वरून ४ थी | मिथ्यत्व | मिथ्यात्व |
| २९ | वरून ५ वी | मिथ्यत्वाच्या | मिथ्यात्वाच्या |
| ३४ | वरून ५ वी | कोणचा | कोण चा |
| ५८ | खालून ६ वी | दृष्यही | दृश्यही |
| ५८ | खालून ५ वी | दृष्यत्वाचे | दृश्यत्वाचे |

# प्रस्तावना :

दुसऱ्या माणसाशी संबंध ठेवणे हा प्रकार पहिल्यापासूनच ऑक्वर्ड वाटत आला आहे. कधीकधी एखाद्या व्यक्तीच्या साहचर्याने भारावून जाणे किंवा कधीकधी अतिशय तुटक वागणे असा दोन्ही प्रकारचा ऑक्वर्डपणा अनुभवाला आला. त्यामुळे लोकांविषयी व एकूण जगाविषयीच उदासीनपणा येत गेला. त्यामुळे कवितासुद्धा निरंतर व्यक्तिगत, सामाजिक कविता अशी होऊच शकली नाही. माझ्यात आणि इतर माणसात साम्य असल्यामुळे या कविता इतरांच्याही होऊ शकल्या तरच ! एरवी माझ्या कविता इतरांशी संवाद कितपत साधतात, साधतील याविषयी साशंकच आहे.

कॉलेजातील कविता या अपरिपक्व वयातील, नैराश्याने ग्रासलेल्या व जगापासून आणि जीवनापासून दूर कुठेतरी नेणाऱ्या. मासिकांना वगैरे पाठवूनही नाकारल्या गेलेल्या, त्यामुळे आपण कवी होऊच शकणार नाही ही निराशा. मृत्यूच्या जाणिवेने वेढल्यासारखी अवस्था. या अवस्थेतूनच एक प्रकारची विरक्तीही आली. ही विरक्ती खरोखरीची की स्मशानवैराग्य ? यासारखे प्रश्न माझे मलाच पडतात. पण उत्तरे मिळत नाहीत. मग प्रश्नच सोडून देतो. जीवनात प्रश्न सोडवता न आल्याने येणारी अपूर्णता ही विनोदी करण्याचा प्रयत्न करतो ! !

अतिशय अपघाती रीतीने कवितांची वही डॉ. बारलिंगे यांच्या हाती पडली. त्यांना कविता आवडल्या, तेव्हा आश्चर्य वाटले. पण आपण चक्क कवीही आहोत या जाणिवेने दिलासा व आत्मविश्वास.

प्रेम म्हणजे काय ते न कळताच प्रेमात पडलो, तत्त्वज्ञान म्हणजे काय हे न कळताच एम्. ए. ला तत्त्वज्ञान विषय घेतला. प्रेम आणि तत्त्वज्ञान या विषयांवर अनेक कविता. प्रचंड अनिश्चितता माझ्याच डोक्यात असल्यामुळे कविता चांगल्या-वाईट कशावर ठरवायच्या हा प्रश्नच. मला फार

आवडलेल्या कित्येक कविता इतरांना फारशा भावत नाहीत असे लक्षात आले. त्यामुळे या संग्रहातील कवितांची निवड ही इतरांची आवड लक्षात घेऊन करण्याचा प्रयत्न केला असला, तरी त्या कविता कितीजणांना कितपत आवडतील ही शंका.

शेवटी, कवी कविता करतो कशासाठी हा सनातन प्रश्न. आत्माविष्कारासाठी कविता करतो की कविता हाच आत्माविष्कार? मग तो तरी कशासाठी ? कदाचित् कविता हा (बऱ्याचदा) निर्हेतुक सहजाविष्कार असेल. कशासाठी कविता यापेक्षा कशामुळे कविता हा प्रश्न सार्थ असेल.

कविता करताना, जणू आपण कुणाशी तरी बोलतो आहोत, कुणाला तरी उद्देशून लिहीत आहोत ही भावना. पण लिहून झाल्यावर ही कविता दुसऱ्याला दाखवावी असे फारसे वाटले नाही. कवितांमधील भावना ही सुद्धा नॉर्मल नव्हती. मुळात कवितेत नॉर्मल भावना असते का हा प्रश्नच. परंतु नॉर्मलसीचे काही स्तर कल्पिता येतील. रेडिओवर गाजणारी गीते, भा. रा. तांबे यांसारख्या कवींची गाणी त्या मानाने नॉर्मल वाटणारी, तर मर्ढेकर, नामदेव ढसाळ यांची कविता ॲब्नॉर्मल विषय हाताळणारी असे म्हणता येईल. अशी ॲब्नॉर्मल कविता काही मर्यादित रसिकांशीच संवाद साधू शकते. अर्थात विद्वानांनी उचलून धरल्यावर त्याच कवितेतील ॲब्नॉर्मल भावनेला प्रतिष्ठा प्राप्त होऊ शकते. पण त्यालाही मर्यादा असतात. जवळचे माणूस मेल्यावर ओक्साबोक्सी रडणे नॉर्मल वाटते, पण ऊठसूठ मृत्यूच्या गोष्टी करणे ॲब्नॉर्मल वाटते. अशी नॉर्मॅलिटी व ॲब्नॉर्मॅलिटी यांच्यातील सनातन सीमारेषा जर ठरविता आली, तर माझी कविता ॲब्नॉर्मलच म्हणावी लागेल. अशा प्रकारची ॲब्नॉर्मल कविता फारशा लोकांना पचत रुचत नाही याची मला जसजशी जाणीव झाली तसतशा नॉर्मल कविता करण्याचा माझा मीच प्रयत्न केला. अलिकडे अलिकडे मी करत असलेल्या कविता मला या दृष्टीने पुष्कळच ठीक वाटतात.

पूर्वीपेक्षा मी खूपच जीवनवादी झालो आहे. मृत्यूवर प्रेम करून सुद्धा मृत्यूने खूपच हुलकावण्या दिल्या. आत्महत्येसारखा मार्ग मला पटत नाही. तेव्हा जीवन अटळच असेल तर मृत्युमैत्री कशाला ? मृत्यू ही एका दृष्टीने अगदी सोपी – केवल घटना आहे. जीवनातील गुंतागुंत – वैविध्य त्यात नाही. मृत्यूचे अनेक प्रकार असतात असे म्हणतात, पण त्या प्रकारतपशीलाचे

बिचाऱ्या मृत्यूला काय भान असते ? जीवनाच्या प्रकार-तपशीलात बरेच काही विचार करण्यासारखे, जगण्यासारखे, अनुभवण्यासारखे वाटले. अनुभव – मग तो सुखाचा असो, दुःखाचा असो – अनुभव म्हणून मूल्यवानच आहे असे वाटले. अनुभवांमध्ये जशी भर पडत गेली तसा आत्माविष्कारात फरक पडत गेला.

यापुढे कसे अनुभव येणार आहेत, त्यांचे कसे आविष्कारण होईल हे सांगता येत नाही. आहे हा वर्तमानकाळ पुष्कळच जगण्यासारखा आहे.

हा काव्यसंग्रह प्रकाशित होण्याचे श्रेय डॉ. बार्लिंगे यांच्याकडेच बव्हंशी जाते. म्हणून त्यांनाच हा संग्रह अर्पण.

११९८, सदाशिव पेठ
पुणे ३०
दिनांक २०-१-७६

**प्रदीप गोखले**

## डोंबारी

जननमरणाच्या सीमारेषेवर
मी आहे
शांतिसैनिकासारखा
मला कुठल्याच देशाशी संबंध नको आहे
पण माहीत आहे
की या तारेवरील कसरतीलाच
जीवन असे नाव आहे
नकोसे झाले असले तरी
हवेहवेसे वाटणे आहे
मरूनही घसघशीत जिवंत रहावे
यंत्रवत असे काही नाही
होऊन द्यावे जीवन्मृत चोथा !
बनायला मन घेत नाही
कोसळलो मृत्यूच्या डांबरी मार्गावर
तरी ढोलक्याच्या तालावर
पुन्हा चढणे भाग आहे !
कारण त्या कातडीच्या वेदनेतून निपजणे
हा माझा धर्म आहे.

मराठी ग्रंथालय ठाणे
दा. क्र. 22335
काव्य
2386
शाखा

## धिक्कार

मूल्ये बेचिराख झाली आहेत माझ्या पायाखाली
निखारे सुद्धा आहेत ज्यात कुठेकुठे
गार चटक . . . गार झलक . . .
फुलासारखे . . . ऊबदार . . .
फोड आल्यावर जाणवणारे
यात विसरून जावे स्वत:चे सुद्धा मूल्य
उभे रहावे तसेच
डोक्यापर्यंत वेदना पोहोचण्याची
वाट जोहत
हा माझा एक विकार असेल
पण पाण्याने तो विझविण्याचा
मला धिक्कार आहे
कारण
मला जीवन नको आहे.

□

## मन-मसण

मन–मसणात माझ्या
थडग्यांची सुटली पोटे
फुले झेलित बेंबीच्या
दुष्ट चक्कार–पंक्तीने

मन–मसणात माझ्या
स्वप्ने झाली भुतेखेते
नाचतात स्वैराचारी
निराशेच्या नग्नतेने
मन–मसणात माझ्या
मन–मसण पुरले
आता उखडा उखडा
नांगरटा रे जोमाने
पुरे झाला माझा मृत्यू
माझ्या पायी माझ्या ठेचा
पुरा नव्हे ! पेरा आता
नेत्र तिजा शंकराचा

□

## मुद्दाम

मुद्दाम
झालो उद्दाम
पण सहज
गहजब झाला
मग मुद्दाम
मीच
सहज झालो

□

## ख्रिस्मस

बा परमेश्वरा ! त्या येशूला क्षमा कर !
तू दयाळू आहेस हा त्याचा भ्रम होता.
तुझ्या नैसर्गिक क्रौर्यावर त्याने आघात केला !
रक्ताळलेली अनेक प्रेते भूमीखाली दडत आहेत,

मात्र –
रस्त्यारस्त्यावर सांडलेल्या
सुऱ्यासुऱ्यावर थबकलेल्या
रक्ताच्या बिंदूबिंदूतून तगणाऱ्या प्राणतत्त्वा !
त्या येशूला क्षमा कर !

ज्ञानाने लाल झालेल्या दृष्टीने
जहाल सृष्टी दाखविण्यासाठी
ज्याने आ वासला
भगवत्‌गीतेतील एकेका अक्षरागणिक
ज्याने एकेक शरीर नष्ट केले
त्या थोर दयाघन परमेश्वरा !
त्या येशूला क्षमा कर !

फासाफासावर लटकणाऱ्या
प्रेताच्या तोंडून बाहेर येणारी जीभ
एकच वाक्य उच्चारणार होती . . .
कसायाच्या कह्यात सापडलेल्या
कोकराच्या अंगातून वाहण्यापूर्वीच
गोठलेली रक्ताची धार

एकच ओळ लिहणार होती . . .
' खिळे ठोकून मारा ' म्हणून
न्याय देणाऱ्या न्यायाधीशाची
थरथरणारी निष्ठुर बोटे
एकच संवेदना हुंगणार होती . . . .
बा परमेश्वरा ! त्या येशूला क्षमा कर.

□

## पाऊलवाट

ही पाऊलवाट न्यारी
आभाळाला जाते
पण चारपाचच
चांदण्या घेऊन येते

या पाऊलवाटे संगे
मला जायला हवे
परत ना कधी
फिरायला हवे

□

## रात्री

रात्री !
तू मला आवडतेस
अमावास्येला
जेव्हा थोपटून थोपटून
साऱ्या जगाला झोपवून
तू आरामात पेंगत असतेस ...

पण मला तुझा रागही येतो
दिवे टाळीत रस्त्यातून भटकताना
जेव्हा मी आंधळ्या आशेने आकाशाकडे बघतो
आणि मला अवाक करून
तू चांदणे शिंपडतेस ...

□

## मी

आपलेच हात आपलीच कुऱ्हाड
आपलेच पाय
आपलेच दात आपलेच ओठ
आपलेच आपण आमचे आम्ही
माझाच मी ...
धर्म अर्थ काम मोक्ष

सोक्षमोक्ष
मीच पौरुष मीच स्त्रैण
या मीपणाच्या मधापोटी
विश्व फूल
बाकी भूल

□

## आम्ही कोण ?

आम्ही कोण म्हणोनि काय पुसता ?
आम्ही असू अल्लाचे चेले
नाहीतर काफर के लोफर
आम्ही असू ताजमहालाच्या
हजार हिंदू कारागिरांपैकी एक !
किंवा त्यांचे कर्तृत्व भलत्याच्याच नावावर घुसडणारे
महान भ्रष्ट इतिहासकार !
आम्ही असू ब्राह्मणाच्या जानव्यावर साचलेली घाण
आम्ही असू महाराच्या देवळातील शेंदरी सोपान
आम्ही पंडिताच्या तोंडातील कुतर्क
नाहीतर मवाल्यांच्या मोहल्यातील अर्क
असू प्रदर्शनात ठेवलेला कागदी पुष्पगुच्छ
नाहीतर अणुबाँबचा किरणोत्सर्ग
आम्ही आहोत परिस्थिती
कृष्णाचे विश्वरूपदर्शन
तुम्ही अर्जुन !
यथेच्छसि तथा कुरु !

□

# आकाश फाटते आहे

आकाशातील समस्त तारकागणांनो !
प्रचंड कोळशात जपलेल्या ठिणग्या तुम्ही
विस्तारणार नाही ?
उन्हात धरलेल्या छत्रीच्या सूक्ष्म भोकांसारखे
क्षुल्लक दिसता तुम्ही
वर्षे जात आहेत, म्हणी रूढ होत आहेत
पण आकाश फाटत नाही
फाटते ते मनश्छत्र
नियतीच्या सुबद्ध काड्यांचा आणि चापाचा ताण सहन न होऊन
ठिगळे शिवली जातात एकावर एक
शेवटी सहन होत नाही
वासांसि जीर्णानि यथा विहाय . . .
अखंड काड्या
अखंड चक्र
बेटा ! छत्रीच टाकून द्यायला काय घेशील ?
ठोक उत्तर नाही
थांब ! आकाश फाटते आहे.

□

## जिजीविषा

माझ्या जिजीविषेच्या करंजीला
तुझ्या जिजीविषेचे पूरण आहे
नाहीतर माझी ती आकांक्षा
म्हणजे नुसता पापुद्रा आहे

ही जिजीविषा, ही आश्चर्यशृंखला
कुणी निर्माण केली ?
मग कुठल्या कारखान्यात तयार झाली ही अगणित विमाने ?
कुठल्या तळावरून सुटली
आणि मी चाललो आहे ?
या विमानाला भराऱ्या घ्यायच्या आहेत
खेळ करायचे आहेत
कारण येथील यंत्रावरोवर
माझ्या कल्पनेची जादू आहे !
वाकडीतिकडी पर्वतशिखरे चुकवत
लांबचा पल्ला गाठतो आहे,
माहीत आहे कोसळणाऱ्या क्षणाची सल
म्हणून बेहोषी पितो आहे,
लक्षात ठेवून – योगः कर्मसु कौशलम्
कारण माझ्या जिजीविषेची लाळ
ठिबकत आहे अधिक रुचकर
पुनर्जन्मकल्पनेत

म्हणून म्हणालो मित्रा
मला तू हवा आहेस
नाहीतर तुझ्या जिजीविषेशिवाय
माझी जिजीविषा
म्हणजे नुसता पापुद्रा आहे

□

## ते घर

जाणिवांची दारं सताड उघडी टाकून
अॅडमसारखं, ईव्हसारखं
शेषशायी विष्णूसारखं
( निसर्गलक्ष्मीची सेवा घेत )
ते घर पहुडलं होतं – – –

वाऱ्याच्याच केरसुणीनं स्वच्छ – अस्वच्छ
पंचमहाभूतांचंच – – –
पानं-फुलं सुगंध देऊन जायची
नेहमी नेहमी सडा व्हायचा
सूर्य उगवायचा, मावळायचा
त्या घरातून फाकून जायचा
दररोज – – –

दारं उघडी टाकून घर प्रसन्न होतं
सारं सादर स्वीकारून परतही देत होतं
जाणिवांची दारं सताड उघडी टाकून ते घर पहुडलं होतं
आपल्यातच आपल्याला अनुभवत

□

## हे घर – ही घरं

हे घर म्हणजे महान सजा आहे
नुसतेच छप्पर, भिंती, खिडक्या, दारे नाही.
नाजुक बंधनांनी इथली माणसं
एकमेकाला करकचून आवळतात
नाहीतर छप्पर भिंतीतून खेळणारी हवा
नासवून टाकतात – – –

रजोगुणांच्या धगधगत्या चुलीवर
इथे डाळभात शिजतो
भाकऱ्या भाजल्या जातात
आणि चिरशांतीच्या नावाने
फुंकण्या फुंकल्या जातात – – –

दिवसभरचे येरझारे
सुखाच्या बुंदी पाडू पहातात
त्यांना प्रेमाचा अन् गरमागरम क्रोधाचा
दर्प येतो – – –

इथली शयनगृहं
गुबगुबीत गाद्यांच्या ढिगाऱ्यात
माणसाला उबवतात, आंबवतात
अन् वासनेच्या रक्तस्रावांनी
थारोळ्यात लोळवतात

हे घर
ही घरं कोलमडून पडत नाहीत
की स्मशानशायी शिवाची देवळं बनत नाहीत
स्मशानातलीच, अतृप्त आत्म्यांची, ही थडगी असतात.

□

## अंतिम कवन

या साऱ्या जगाला
शेवटचा सलाम
जगा, जगत रहा
तेवत रहा तुझ्या गतीने
असंख्य कण तुझ्यातील
जे आत्ता इन्धन आहेत
ते दुसऱ्याच क्षणी ज्योत होत आहेत
तिसऱ्याच क्षणी त्यांचा धूर होईल
चवथ्या क्षणी ते असतील ? नसतील ?
प्रत्येक कण
वर्तमान,
परिवर्तमान
ज्योतीला
सत्य मानतो आहे
'आजचीच ज्योत उद्या राहील
उद्याची परवा

धूमकण झालेला
वा कर्बद्विप्राणिल
मी
पुन्हा इन्धन बनेन
आणि जगाला तेववेन '
या इर्षेने.
खुशाल ही ईर्षा तेवो
मी आहे
त्यातीलच एक कण
निराश
अनंतलेला
ज्योतीची, प्रत्येक मूर्ख कणाची
आणि बेभान वायुगतीची
लीला पाहून
निवृत्तलेला
खुदा हाफिज !

□

## मी जगलेच पाहिजे

मी जगलेच पाहिजे
का म्हणून ?
कारण जगणे कुणाच्या हातात नसते

मी झुरलेही पाहिजे
का म्हणून ?
कारण झुरणे कुणाच्या हातात नसते
आणि मी मेले पाहिजे
कारण जगण्यात मरण समाविष्ट असते

□

## अमृताचा प्याला पिऊन

अमृताचा प्याला पिऊन
मी एकच वाक्य बरळलो
मी आता जगत नाही
माझे जगणे
एक झाले इंद्रजाल
तुमच्या फसवणुकीची मला कल्पना आहे
अमृत राहिले नाही
रिता झालेला पेला चाटण्यासाठी
माझ्या असंख्य खोटचा जिभा मात्र लवलवत राहिल्या
एकेक ओळ पीत

□

## मरणावर कितीही कविता...

मरणावर कितीही कविता केल्या
तरी त्या
मरेपर्यंत अपुऱ्या असतात
जीवनावर काहीही लिहिलं नाही
तरी जगल्यानंतर
ते पुरेसे असते
आता मी मरणावर
जगायचे ठरवले आहे

□

## येवो सागर भस्मा फासत

तुफान आनंदाने हासत
आला सागर फेसा फासत

हातांच्या लाटांनी नर्तत
रुद्र जणू ये अंगावरती
अफाट उधळित रज भस्मांकित

आता माझ्या नाजुक हाती
वाळुच, कुठं शाडूची माती ?
माझ्या गात्री खिदळत यावे
स्वागतितो ते समुद्र साती

वैराग्याचे अफाट लेणे
देह बिंदु मम त्यांचे देणे
तुफान आनंदाने हासत
येवो सागर भस्मा फासत

□

## रात्र गेली फुका फुका

रात्र गेली फुका फुका
चंद्र गेला सुनासुना
मोजता मोजता हरवून गेल्या
चांदण्यांच्या पाउलखुणा

नेत्र माझे अर्धे झाले
गात्र गात्र मिंधे झाले
देखणे देखणेपण माझे
पहाता पहाता अंधे झाले

गाढ तुझ्या वक्षावरती
दोन चंद्र बहकले होते
त्यांना स्पर्शण्यापूर्वीच माझे
हात अनंतात पोहोचले होते

□

## माझ्या छोटयाशा घरात

माझ्या छोटयाशा घरात मदिरेचे सडासारवण होउ दे
माझ्या छोटयाशा घराचा मला उमरखय्याम होउ दे

लालबुंद मदिरेने मन लाल लाल झाले
दर्दभऱ्या आलिंगनात लाल तुझे गाल झाले
तुझ्या गालातल्या गालात मला खुदकन हसू दे
माझ्या छोटयाशा घराचा मला उमरखय्याम होउ दे

माझ्या छोटयाशा घराचा मी देखणा राजा गडे
राणीपदाची प्रौढ जबाबदारी तुझ्याकडे
तुझ्याकडे प्रफुल्लित रोमांचांना आपले प्रजाजन होउ दे
माझ्या छोटयाशा घराचा मला उमरखय्याम होउ दे

माझ्या छोटयाशा घराला नाही खिडकी नाही दार
एक अथांगशी शेज पसरली दिलदार
विश्वा वस्त्र पांघरून तुला मोकळे होऊ दे
माझ्या छोटयाशा घराचा मला उमरखय्याम होऊ दे

माझ्या छोटयाशा घरात मदिरेचे सडासारवण होउ दे
माझ्या छोटयाशा घराचा मला उमरखय्याम होउ दे

□

## मृत्यूची ही मञ्जुळ घंटा

मृत्यूची ही मंजुळ घंटा
संध्याछाया सुखवी हृदया

दुपारचे त्या रणरणणाऱ्या
भोग संपूनी रोग संपुनी
रात्रीच्या दुलईत झोपण्या
उत्सुक झाला आत्मा तान्हा

बास प्रियकरा ! अता भोगणे
अध्यासाने बलात्कारणे
तू जा तिकडे सूर्यामागे
क्षितिजाची ध्रुवरेषा शोधत
माझा आत्मा चंद्र होउनी
पृथ्वीचे गुण बसेल हुंगत

आता माझ्या कानी घुमते
यम-महिषाच्या गळयात सुंदर
मृत्यूची जी मंजुळ घंटा
संध्या छाया सुखवी हृदया

□

## काही अल्प कविता

स्वप्नांनी असावे भव्य गरुड भरारीवानी
पंख असावेत ताजे ताजे आणिक आरस्पानी
पंखापलिकडले वास्तवाचे जग स्वच्छ दिसावे
मनाने मात्र बेगुमान, अस्मानी विहरत असावे

□

मी तर आता देव झालो
शुद्ध प्रेमाचा भुकेला
नाही मिळत म्हणूनी
फक्त फिरतो अकेला

□

आयुष्याच्या नावाने जव जाहिर केली आणीबाणी
थंडपणा ही आता माझी मृत्यूची मधुर निशाणी

□

आमच्या पायांना डोळे फुटले
तेव्हा पृथ्वीच्या
आणि पार्थिवतेच्याही आरपार जाऊन आलो

□

इतर मनांचा प्रश्न इतर मने सोडवतील
(ती असली तर)
माझ्या मनाचा प्रश्न मी निष्प्रभ करीन
(ते असल्यामुळे)

नवीन दिवसाला नवीन कविता असू दे
नवीन विरहाला नवीन वेदना दिसू दे

नव्या फुलांतून नवीन गंध हसू दे
नवीन मला पाहून जुना मी फसू दे

□

ढगाळले माझे डोळे
जरी आकाश जाहले
अंधारले माझे डोळे
जरी प्रकाश-माखले

□

तू याच जगात वावरत आहेस
मी याच जगात वावरत आहे

पण तू वेगळ्या जगात वावरत आहेस
आणि मी वेगळ्या जगात वावरत आहे

□

आरपार ही दुपार मुरते
सामोरी तूही सूर्यांकित
विरघळून जातो मी देही
देहपणा अन होतो शंकित

स्वातंत्र्याने महाग झालो
माझे तेही मला कळेना
स्वतंत्र होता अतंत्र झालो
पारतंत्र्यही खरे मिळेना

श्री ग्रंथ संग्रहालय ठाणे
२२३३५
दा. क्र. ८१४५
२३७६
शाखा (स्थळ ...)

## पद्ूचे अभंग

पुरे पुरे आता । यौवनाचा त्रास ।
आनंदाचा ग्रास । फक्त घ्यावा ॥ १ ॥

चेतलेले चुते । म्हणतील वृद्ध ।
तरिही व्हावे सिद्ध । साधनेसी ॥ २ ॥

पद्या बोंबलतो । साधना साधना ।
नटीचेच जना । नाव वाटे ॥ ३ ॥

थुत्कारावे आता । सकळ जनासी ।
अविद्येच्या नासी । सिद्ध होता ॥ ४ ॥

कोणाच्या वाटचाला । काय काय येते ।
जेवण आयते । मिळे कोणा ॥ १ ॥

उपाशी पोटाने । कुणा मारामार ।
दूधतूपधार । कुणा मिळे ॥ २ ॥

कुणाची बायको । नखरेल सुंदरी ।
कुणाची उंदरी । बरी म्हणा ॥ ३ ॥

पदू म्हणे आता । जाहलो संन्यासी ।
वैविध्य उरासी । बाळगोनी ॥ ४ ॥

पाहिली एकंदर । दुनिया कैसी अंदर ।
मानवनामे बंदर । मिरवी कैसा ॥ १ ॥

पाहिली एकंदर । विज्ञानप्रगती ।
मिळाली सद्‌गती । पाहूनीच ॥ २ ॥

निसर्गावरती । मानवाची मात ।
त्याचीच अन् मात । त्याजवरी ॥ ३ ॥

पदू म्हणे आता । वैविध्य पाहोनी ।
जपत बसलो । आत्मसुख ॥ ४ ॥

## जे इथे पाणी

जे इथे पाणी पाहतो
तेच तिथे दिसले असते
आणि निर्धारलेल्या मनाने त्याला
जलसामान्य म्हटले असते
त्याच असत्या डोंगरदऱ्या
हिमाचल नाव धारण करून
जुन्या काडीवर नवा
थर ऐस्क्रीमचा धारण करून
जलसामान्य म्हटले असते
पर्वतसामान्य म्हटले असते
सामान्यांचेच जे सामान्य
त्यालाच ब्रह्म म्हटले असते

□

## गुपीत पीत बसला होतास

गुपीत पीत बसला होतास
आणि अचानक मी तुला दर्शन दिले
तेव्हा दचकलास ना ?
गुपीत फोडणाऱ्यांच्या कुटाळ कंपनीत सामील हो
गुपिताशिवाय
माझ्यासह
सारे काही तुला प्यायला मिळेल

□

## शून्यारण्यक

शून्यापासून सुरवात करणेच सोयीचे असते
कारण शून्यावरचा माणूस एक, दोन, तीन,
पुन्हा शून्यही होऊ शकतो
पण एकापासून सुरवात करणाऱ्याला माणसे म्हणतात
अरे ! तू एक आहेस
आता तू दोन हो !
तू दोन आहेस
आता तू तीन हो !
आणि तो ही म्हणतो,
एवी तेवी मी एक आहेच,
तेव्हा मला अजून एक, अजून एक व्हायला हरकत नाही
आणि हरकत नसतानाही मी झालो नाही
तर ते काय म्हणतील ?

पण शून्यावरचा माणूस जेव्हा एक होतो
आणि लोक म्हणतात
अरे, तू एक आहेस
आता तू दोन हो !
तेव्हा विनम्रपणे शून्यापासूनचा माणूस म्हणतो
मी आता एक असलो,
तरी मुळात मी शून्यच आहे
( म्हणून प्रत्येकाने प्रथम आपापले ओरीजिन तपासून पहावे )

उदाहरणार्थ असे म्हटले गेले आहे,
की प्रत्येक विधानात असते एक सत्य
अन् प्रत्येक विधानाला असतो एक आक्षेप
जो त्या सत्याचे मिथ्यत्व ठरवायला टपून बसलेला असतो
म्हणून मी जेव्हा मिथ्यत्वाच्या अधिक भक्कम पायावर
उभा राहून
लोकांची विधाने ऐकतो
आणि त्या विधानांतील सत्यांशी
हसत हसत हस्तांदोलन करतो
त्यावेळी ती सत्येही अभावितपणे संभावित होतात
आणि मीही संभावितपणे अभावितच राहतो
म्हणून मला जे म्हणायचे होते
ते शून्यत्व
या शब्दखेळाच्या अखेरीसही संपन्न होते आहे.

□

## मी त्या दुकानात

मी त्या दुकानात विचारलं,
हसत खेळत—इंग्रजीची पुस्तके असतात
तशी हसत खेळत जगाला रामराम ठोकण्याची
काही योजना आहे की नाही ?
तेव्हा ते माझ्याबरोबर हसले, खेळले
पण त्यांनी काही जगाला रामराम ठोकला नाही
म्हणून मी खुद्द जगाकडेच गेलो

म्हटलं, वा जगा,
तुझा निरोप घेण्यापूर्वी
कसं हसायचं, खेळायचं ते तरी सांग
पण जगाने स्वत:भोवती फिरण्याचं सोडलं नाही
म्हणून मी स्वत:भोवती फिरत फिरत पहातो
की आपल्या प्राचीन हास्यांचे तुषार
कसे आपल्याकडे चकाकत्या नजरेने पहात आहेत
आणि आपले जगात राहणे
म्हणजेच कसे जगाला रामराम ठोकणे झाले आहे

□

## अर्थांपासून दूर जाणाऱ्या शब्दांकडून

अर्थांपासून दूर जाणाऱ्या शब्दांकडून काहीतरी शिकण्यासारखं असतं
जसं वचनभग्न प्रेयसीपासून दूर जाणाऱ्या प्रियकराकडून
अशा शब्दांना एकांतात गाठावं लागतं
त्यांच्याशी अर्थविहीन घासाघीस करावी लागते
तेव्हा कुठे ते नि:शब्द होतात
अर्थांपासून दूर जाणाऱ्या शब्दांना काहीतरी शिकविण्यासारखं असतं
ते स्वत:ही एक निरर्थक अर्थ असल्याबद्दल.

□

# हल्ली झोपच झोपी गेल्यामुळे

हल्ली झोपच झोपी गेल्यामुळ
जागेला सारखे जागे रहावे लागत आहे
अंधार मावळू लागल्यावर
प्रकाशाला प्रकाशण्याशिवाय काय करणे शक्य आहे ?
हल्ली काम कामात गढून गेल्यामुळे
नैष्कर्म्याकडे लक्ष द्यायला त्याला सवड नाही
आणि नैष्कर्म्यही स्वस्थ बसून राहिल्याने
कामाला काम करण्याखेरीज तरणोपाय नाही !
हल्ली मरण मरण पावल्यामुळे
सतत जन्माला जन्म घ्यावा लागत आहे
आणि अशरीरीने आपला आत्माच गमावल्यामुळे
शरीराला शरीर धारण करणे भाग पडत आहे
जन्मण्याची, मरण्याची, अस्तित्वाची, अनस्तित्वाची कहाणी
इतकी सोपी आहे
की त्यात 'मला' काही ढवळाढवळ करण्याची संधीच नाही

□

## असाच मी उभा

असाच मी उभा
हात पसरुनी
भविष्ये अन् भूते
मनी विसरुनी ॥१॥
विश्व पसरले
पंख विस्तारुनी
पाठीवरी त्याच्या
आरूढ होऊनी ॥२॥
कालकल्पनेच्या
अतीत मी होतो
विश्वात्मकपणे
विश्वास भोगतो ॥३॥
असाच मी उभा
हात पसरुनी
विश्वातीतपणे
विश्वात भरुनी ॥४॥

□

## मी असा मृत्यूचा विचार

मी असा मृत्यूचा विचार करतो
तेव्हा आतून अनाहूत जीवन अकस्मात कसे उफाळते ?
मी जेव्हा भयाचा स्वीकार करतो

तेव्हा आतून अनामिक धैर्य एकाएकी कसे एकवटते ?
मी जेव्हा शून्यमग्न होतो
तेव्हा अस्तित्व अचानक माझ्या जाणिवेला कसे लपेटून टाकते ?
संशयाची विदाही वासना माझ्यात जागृत होते
म्हणून मी श्रद्धेलाच आलिंगन देतो ना ?
मृत्यूची जीवघेणी तडफड माझ्या अंगांगातून प्रकटते
तेव्हा तिलाच जीवन नाव प्राप्त होते ना ?
' मी शून्य आहे ' अशी गगनभेदी आरोळी मी ठोकतो
तेव्हा 'मी आहे' एवढ्याच विधानांशाचा प्रतिध्वनी ऐकू येतो ना?

□

## विशिष्ट शब्दार्थ संबंधात आपली जाणीव

विशिष्ट शब्दार्थ संबंधात आपली जाणीव पुरून ठेवली,
तर त्या जाणिवेच्या खऱ्या अर्थाला आपण मुकतो
आणि म्हणून
शब्दार्थसंबंधाच्या अतीत जेव्हा आपण झेप घेऊ
तेव्हा क्षणभर जरी ती अंधारातली झेप वाटली
तरी त्यातूनच खऱ्या ज्ञानाच्या वाटा खुल्या होतील

मी कोण आहे या प्रश्नाचे उत्तर
आपण विवक्षित शब्दांत देऊ लागतो
पण निश्चित शब्द न सापडल्याने
आपण शून्यवादी तरी होतो,
किंवा वेगवेगळ्या विरोधाभासांना जन्म देतो

आपले अस्तित्व खरे तर शून्यही नसते
किंवा विरोधाभासीही
विरोधाभास शब्दांत असतो
अर्थात नसतो

आणि म्हणून मी कोणचा छडा लावण्यासाठी
प्रथम शब्दार्थसंबंधाची पुटेच दूर करावी लागतात
नंतर जे सापडेल ते शब्दात सांगता यायचे नाही
याची आधीपासूनच तयारी ठेवावी लागते
नंतरचा बुद्धिभ्रंश टळावा म्हणून

□

## माझी कविता

कविता विचित्र चित्रासारखी
अस्ताव्यस्त पसरते
संकटरहित अमिबासारखी
कशीही, कुठेही !

शब्द इथून तिथून सारखेच !
हरेक नाम ओठावर येण्यापूर्वी
कधीं ना कधी झालेले असते बदनाम !
आणि ताणातून अस्ताव्यस्त पसरणारे
बदनामीतून नामवंत म्हणवणारे

शब्दलिंग
माझी कविता
कपाळावरील घाम निथळून टाकावा
तसे मी मनोविश्वाला शब्दांतून मोकळे करतो

□

## इतरांपेक्षा वेगळे

इतरांपेक्षा वेगळे असे मी काय लिहिणार ?
इतरांनी चावून चोथा करून फेकून दिलेल्या पानांचाच
गुलाबी विडा कसा रंगवणार ?

इतर जे लिहितील
त्याचाच पूर्णविराम मी होणार
त्याच्याच पूर्णविरामापुढे मी पसरणार

□

## एक कवितिका

आख्खीच्या आख्खी रांग अडवून बसलो आहे मी
कृपया त्यांना डिस्टर्ब करू नका.

गाणाऱ्यांना गाऊ देत गाणाऱ्यांचेच शब्द
उदाहरणार्थ माईक शब्दाचा अर्थ माहित आहे
हे तो दाखवतोय

आपले अस्तित्व खरे तर शून्यही नसते
किंवा विरोधाभासीही
विरोधाभास शब्दांत असतो
अर्थात नसतो

आणि म्हणून मी कोणचा छडा लावण्यासाठी
प्रथम शब्दार्थसंबंधाची पुटेच दूर करावी लागतात
नंतर जे सापडेल ते शब्दात सांगता यायचे नाही
याची आधीपासूनच तयारी ठेवावी लागते
नंतरचा बुद्धिभ्रंश टळावा म्हणून

□

## माझी कविता

कविता विचित्र चित्रासारखी
अस्ताव्यस्त पसरते
संकटरहित अमिबासारखी
कशीही, कुठेही !

शब्द इथून तिथून सारखेच !
हरेक नाम ओठावर येण्यापूर्वी
कधीं ना कधी झालेले असते बदनाम !
आणि ताणातून अस्ताव्यस्त पसरणारे
बदनामीतून नामवंत म्हणवणारे

शब्दलिंग
माझी कविता
कपाळावरील घाम निथळून टाकावा
तसे मी मनोविश्वाला शब्दांतून मोकळे करतो

□

## इतरांपेक्षा वेगळे

इतरांपेक्षा वेगळे असे मी काय लिहिणार ?
इतरांनी चावून चोथा करून फेकून दिलेल्या पानांचाच
गुलाबी विडा कसा रंगवणार ?

इतर जे लिहितील
त्याचाच पूर्णविराम मी होणार
त्याच्याच पूर्णविरामापुढे मी पसरणार

□

## एक कवितिका

आख्खीच्या आख्खी रांग अडवून बसलो आहे मी
कृपया त्यांना डिस्टर्ब करू नका.

गाणाऱ्यांना गाऊ देत गाणाऱ्यांचेच शब्द
उदाहरणार्थ माईक शब्दाचा अर्थ माहित आहे
हे तो दाखवतोय

निरंतर व्यक्तिगत झाल्याशिवाय विश्व सहन करता येणार नाही.
'सॉरी' ज्यांच्या जीवनात मिसळून गेला आहे.
त्यांना खऱ्या सॉरोफुलनेसची दाद नाही
माझं प्रेम मोठं मोठं होत असता तुम्हाला सामावून घेऊ शकतं

हसता येतं म्हणून प्रत्येक गोष्टीला हसत जायचं
तेलगूला तेल आणि गू म्हणायचं
तुमच्या जाणिवकक्षेच्या खूपच पुढे गेली आहेत ती मंडळी
अर्थात गोळाबेरीज शून्यच

□

## आसक्तिशून्य निःसंदेह पोकळी

आसक्तिशून्य निःसंदेह पोकळी
आणि तरीही बेभान सागराप्रमाणे हेलावणारा तुझा स्वर
पोकळींचे अस्तित्व नाकारीत असला
तरी स्वतःच्याच निरंतर अस्थैर्याने
तिचेच अस्तित्व सिद्ध करीत नाही काय ?

पोकळी कळीप्रमाणे उमलू दे सुवासांकित
जीत माझी जाणीव फक्त असेल निःसंदेह
आणि पोकळीचेच तलम वस्त्र ल्यालेली
वस्तुतः विदेह

□

## जितका जितका उंच झालो

जितका जितका उंच झालो
व्यक्तिमत्वाच्या दरवाजातून जाता यावे म्हणून
तितका तितका वाकत गेलो

अपार ब्रह्माच्या साक्षीने
जगाशी तह करीत गेलो
तडजोडींनी माणसे जोडीत गेलो
जगापासून स्वतःला तोडीत गेलो
मोडीत गेलो

जितका जितका उंच झालो
तितका तितका पुन्हा उंचच झालो
व्यक्तिमत्वाचा दरवाजा खोडीत गेलो

□

## वेड्यांनी वेड्यात काढलेल्याने

वेड्यांनी वेड्यात काढलेल्याने
खुशाल स्वतःला शहाणे म्हणवून घ्यावे
घ्यावे क्षणाचे भूत उरावर
वरवर मात्र भविष्यपार गेल्याप्रमाणे...

भविष्यपार गेल्याप्रमाणे मी तुमच्यातून सरकत जातो
पण तुम्हालाही ते समजत-उमगत नाही

नाही म्हणायला आपापल्या तुटपुंज्या बोटांनी
तुम्ही माझ्या भूतवाण्या सावल्या चाचपत बसता ...

हसता हसता निघून जाईल रात्र
पण पहाटेस पडलेले दव अश्रूंची आठवण देईल ना !

□

## कुठूनतरी अस्तित्वावर शिक्कामोर्तब

कुठुनतरी अस्तित्वावर शिक्कामोर्तब व्हायचे आहे
अस्तित्वाचा फॉर्म भरून मी
या ऑफिसातून त्या ऑफिसाकडे
या साहेबाकडून त्या साहेबाकडे
फिरतो आहे पण शिक्का मिळत नाही.

उद्या या, तुम्हाला पाच मिनिटे उशीर झाला
साहेब रजेवर गेले आहेत ...
शिक्कामोर्तब नकारांचेच मनावर झालेले
तरीही आशेची शाई निर्वासित समाधानात आहे

कुठून तरी अस्तित्वावर शिक्कामोर्तब व्हायचेच आहे
येईल तेव्हा येवो शिक्काबहाद्दर माईका लाल
येईल तेव्हा येवो, तोवर नकारांचे शिक्के
घासूनपुसून मीही स्वच्छ करतो आहे
प्रत्येकाच्या आकांक्षांवर मारण्यासाठी

□

## उदाहरणार्थ डोळे उघडून

उदाहरणार्थ डोळे उघडून किंवा फाडफाडून
मी जगाची अस्मिता समजावून घेण्याचा नाहक प्रयत्न करतो
पण माझे गमावलेले डोळे प्रतिबिंब बनून माझ्याकडे बघतात
तेव्हा ते माझे राहिलेले नसतात,
जगाची अस्मिता बनलेले असतात !

खरे तर जगाची अस्मिता मला समजावून घेण्याचा
प्रयत्न करीत नसते, करणारही नसेल कदाचित
कारण माझी अस्मिता भस्मसात झाल्यानंतरचे
दगडी डोळे जगांने पांघरलेले असतात
आणि चमत्कारिक कुतूहलाने
मी जगाच्या दगडी हृदयाचा आकृतिबंध न्याहाळत असतो

□

## तू सुंदर कविता दिलीस

दगडी हृदयावर कोरायला तू सुंदर कविता दिलीस
पण तितकेच भक्कम हात दिले नाहीस

अहंकार दिलास, उन्माद दिलास.
पण तोही अर्धांगवात झाल्याप्रमाणे थरथरत राहिला
आणि तू दिलेली कविता प्रकट होण्यासाठी
फक्त चाचपडत राहिली !

दगडी हृदयावर कोरायला तू सुंदर कविता दिलीस
आणि छिन्नीदाखल मी एवढेच ध्रुपद हातात घेऊन बसतो
की दगडी हृदयावर कोरायला तू सुंदर कविता दिलीस

□

## नेमकेपणाने स्वतःला मांडू तरी कसे ?

नेमकेपणाने स्वतःला मांडू तरी कसे ?
हा प्रश्न मनात गर्दी करून राहिला आहे
समजा, विधात्याने मला जगाच्या बाजारात मांडले,
तर त्याच्यासमोर माझ्या नेमकेपणाचा हा प्रश्न नेमका नव्हताच !
व्यवस्थित त्याने माझा उजवा हात उजव्या हाताच्या
जागी चिकटवला, डावा डाव्याच्या जागी
इत्यादी इत्यादी सर्व अवयव व्यवस्थित चिकटवले
मग माझ्यापुढेच या अवयवांच्या रचनेचा प्रश्न कसा ?
मी आहे तसाच अभिव्यक्त होऊ शकत नाही काय ?

□

## असंतुष्ट तर्कज्ञ कर्कशपणे कोकलतात

असंतुष्ट तर्कज्ञ कर्कशपणे कोकलतात
सत्याची प्रत्येक आगगाडी
त्यांना शब्दांच्या समान्तर रुळांवरून जायला हवी असते

रुळावरून घसरलेली माझी आगगाडी
जेव्हा मृत्युची शांतता पोटात घेते
तेव्हा तर्कज्ञांच्या कर्कश प्रज्ञेच्या अतीत
मातीत रुतलेला माझा आत्मा शांत होतो

□

## प्रेम करण्यासाठी

प्रेम करण्यासाठी माझीच कविता फक्त मला
प्रेम करण्यासाठी मीच फक्त मला
प्रेम करण्यासाठी प्रेमच फक्त मला

शस्त्रावरच शस्त्रक्रिया करण्याची पाळी यावी
तशी आज प्रेमाची गत आहे

□

## नाही, खरोखरच कठिण आहे

नाही, खरोखरच कठिण आहे
जे व्याकरण मी अभ्यासलं आणि
डिक्शनरी उलटीपालटी केली, त्यापेक्षा
वेगळे काहीतरी मला सांगायचे आहे.

□

## Kill the time, otherwise it will kill you

मी एकांतात, एकटाच बसून जेव्हा न्याहाळतो
आसपासच्या हालचालींचे हलके अस्पष्ट हेलकावे
आणि कदाचित त्यांतील अन्तर्निहित कावे
तेव्हा बारकावे सुटलेल्या माझ्या नजरेतूनही सुटत नाहीं
काळाची असंदिग्ध अरेरावी
ज्या काळाचे आपण घटक आहोत,
त्यालाच अटक करण्याचे फर्मान
मृत्यूने आज केले आहे
प्रत्येक संवेदनेला, जाणिवेला आणि ज्ञानाला
आणि प्रत्येक संकल्पनेला गृहीत धरावे लागते
काळाचे अस्तित्व
पण शून्याला ? अवकाशाला ?
वस्तू प्रमाणे अवकाश इकडून तिकडे सरकला
असे कुणी पाहिले का ?
इकडून तिकडे अवकाश सरकल्यावर
इकडे काय राहिले ?
पुन्हा फक्त अवकाश
अवकाश ! होय, पोकळी सर्वसत्ताधीश आहे
सत्ता जिने मिळवली आहे काळावरही
काळ तिची इकडची काडी तिकडे करू शकत नाही
( असल्यास )

आणि म्हणून काळाचे हनन
आपण करू शकतो, आणि अवकाश सहन

पण अवकाश आपण नष्ट करू शकत नाही
फक्त निर्मळ अवकाशाचे अशरीर चुंबन
आपण घेऊ शकतो ( काळवेळ न जुमानता )
बेफिकीर प्रेमिकाच्या धुंदीत !

काळावर स्वार व्हा पोकळीची अस्मिता
पिण्यासाठी
नाहीतर काळ तुमच्यावर स्वार होईल

□

## विचाराला सुरवात

विचाराला सुरवात कशी, कुठून करायची ?
प्रश्न कुठला आहे ?
इथपासूनच खरेतर प्रश्नांना सुरवात होते

वाट्टेल तो प्रश्न विचारा, उत्तर आहे !
वगैरे प्रपंच आजवर काल-कागदावर पंच केला गेला आहे.
आणि सगळे प्रश्न सुटले आहेत
पण प्रश्नांतून आम्ही सुटलो नाही !

□

## प्रत्येक प्रश्नाचा एक संदर्भ

प्रत्येक प्रश्नाचा एक संदर्भ असतो
संदर्भ बदलल्यावर प्रश्न रद्दबातल ठरविण्याची काळजी
आपण घेत नाही
जुन्या पिढीसमोर वाकलेल्या मानेने
चुकीच्या प्रश्नांची चुकीची उत्तरे
आपण कुर्निसात करून नजराण्याप्रमाणे स्वीकारतो
आणि दुष्ट संदर्भाच्या इंगळ्या
जेव्हा त्या उत्तरातून सटासट बाहेर पडतात
तेव्हा आपण अवाक् होतो
काळाच्या थोरवीने हतबल होतो
आपण एकमेकाला नीटपणे कधीच समजावून घेत नाही
ज्या दुष्ट संदर्भात आपली मान अडकली आहे
त्यांना टाळून आपण आपले पोस्टमार्टेम करतो

□

## पृथ्वी गोल आहे

पृथ्वी गोल आहे
आणि माझी बुबुळेही गोल आहेत
चहा ज्या बशीत ओतला जातो
ती बशीही गोल आहे
चहा रिचल्यावर जे भडकते आणि शांत होते
ते उदरही गोल आहे

जगाच्या उदरपोकळीत खोलवर
माझी बुबुळे रुतविली आहेत मी
ज्ञानाचे ग्रहण जे जगाला लागले आहे
आणि त्यावर प्रकाश टाकून
सूर्य जो दिवसेंदिवस पापी होत आहे.

□

## मला नागडे व्हायचे आहे

मला नागडे व्हायचे आहे
नदीकाठी एकटचाच बसलेल्या नागड्या माणसाचे चित्र
दररोज माझ्या डोळ्यांपुढे येते
एक स्थितप्रज्ञ चिंतक असतो तो
चिंतन तो करीत नसतो
तर काठावर झुळझुळ वाहणाऱ्या वाऱ्यांचे विचार
तो फक्त ऐकत असतो

□

## अजून थोडासा थांब

अजून थोडासा थांब
थबकत मुरडत चालणारी तुझी जीवनगाथा
कुठल्याही यंत्राला बांधण्याचा निर्णय
इतक्यात घेऊ नकोस

घनगर्द अवकाशात दाटलेल्या मेघांना
विजांची चमक दाखवू दे बराच वेळ,
आहे ते पाणी मूर्ख पृथ्वीवर सांडून टाकण्याचे
त्यांनी इतक्यात ठरवले पाहिजे असे नाही
आणि सूर्यालाही सत्रांदा विचार करू दे दररोज
उगवण्यापूर्वी

□

## वाईफ पेक्षाही मादक

वाईफपेक्षाही मादक लाईफला
डोळा मारून मारून सुजवट झालेले
हे गाल,
आणि हे शरीर
मिथपेक्षाही अनपेक्षित डेथकडे
झेपावणारे
डोळा मारणे आणि मिचकावणे
यातील पापी साम्य
स्पष्ट करणारे

□

## तू हास लोलकाप्रमाणे

तू हास लोलकाप्रमाणे
समाप्तीच्या उदरातून आनंदाचा अध्यास
प्रकट होऊ दे

आणि तू हसता हसता त्यातच
माझ्या असमाप्त जीवनाचे दुःख
मावळून जाऊ दे

□

## जर काहीच कळत नाही मला

जर काहीच कळत नाही मला
तर पुन्हा हा समजुतदार मी आला कोठून ?
कोठून पडतात ही आकाशपुष्पे
माझ्या देहावर ?
जरी सहजपणे नाकारू शकतो मी
इतर मनांचे अस्तित्व,

तरी पुन्हा पुन्हा 'तू' माझ्यासमोर कसा येतोस ?
मी पुन्हापुन्हा 'तुला' अर्घ्य कसे देतो ?

□

## जुन्या पिढीला उद्देशून

तुमच्या हितकल्पना तुमच्याबरोबर खड्ड्यात जाणार
आमच्याही हितकल्पना आमच्याबरोबर, पण
तुमच्या मागाहून काही वर्षांनीं खड्ड्यात जाणार

आमच्या हितकल्पनांना विरोध करण्यासाठी
नवी शक्ती घेऊन
तुम्हीं आमच्या पोटी जन्म घेणार
हे आम्हाला माहीत आहे

## हे दिवस

आणि क्वचितच भरून येणारे हे दिवस
आरपार पुरून टाकणारे
पुरून उरणारे हे दिवस
दिसामासांच्या मांसाने सुजवट बनलेले हे दिवस

हे दिवस आकाशाच्या घनगर्द पोकळीला
व्यापून टाकतात
आरपार भारून टाकतात
भरून राहतो मी दिक्कालातीत
माझी संवेदना ऐकू येत नाही मला

मी संवेदनाशून्य झालेला असतो खरे तर
खरे तर मी शब्दपुष्पे रचीत असतो
माझ्याच मढ्यावर

स्मशानात भरलेल्या फुलांच्या ढिगावरून
जळाऊ प्रेताच्या अस्तित्वाची कल्पना करायची
तशी कवितांवरून माझी

माझ्या कविता तू माझ्यासह
जाळून टाकू शकतोस
पुरून टाकू शकतोस

पण तू प्रेत झाल्यावर पुन्हा
अंगावर निर्वाणशांतीची फुले पडतात ना, म्हणून
हळूच टकामका पाहशीलच ना ?

## एक अभंग

आता माझ्याकडे
शून्येच चिक्कार ।
त्यांनीच गब्बर
झालेला मी ।।

आहे येथे आता
प्रचंड पोकळी ।
नास्तित्वाची कळी
खुललेली ।।

भीतीने धरले
विश्वाकार धैर्य ।
पतनांनी वीर्य
वाढलेले ।।

आहे एक प्रभू
दगडांचा राजा ।
मिरविती खाजा
भक्तिनामे ।।

□

## आणि इथे हा 'अहं'

आणि इथे हा 'अहं' पेटला
आज जेथला आणि तेथला
निरर्थ सारे वाङ्मय झाले
इन्धनात त्या अहं पेटला

इन्धन झाले शब्दांचे या
इन्धन झाले शरिरांचे या
इन्धन झाले अहं स्वाचे
सर्वांसह त्या अहं जळाला

□

## नग्नवृक्षाचिया

नग्न वृक्षाचिया शेजारी मी उभा ।
जाळीत कोंभा । अंतरीच्या ॥

पिकलेली पाने मुकी गळतात ।
तसे शब्द माझ्या । ओठावर ॥

□

## तू पाहू नकोस

मुद्दामहून आक्रमण करून
हासिल केलेला सहजपणा
आणि कमावलेली निरागसता
माझ्या डोळ्यात

तू पाहू नको
तुला हवे ते त्यात गवसणार नाही
हवेपलिकडील आकाश
तुला त्यात शोधायचे असेल
तर त्यात तूही हरवून जाशील

## हृद्गत सांगण्यासाठी

हृद्गत सांगण्यासाठी तू दाराशी आलीस
तेव्हा रस्त्यावरील झंझावाती वाहनांनी
मला खेचून नेले अनंतपार
मी तुझा राहिलो नाही

हृद्गत तू हृदयाशीच बोललीस
तुझे हृदय अनंतपारही
मी शोधीत राहीन

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२२३३४
ना. क्र. ९१०४
२३४८
शाखा (स्थळ प्रत)

□

## खरे तर सहज उलटून जाणारे

खरे तर सहज उलटून जाणारे दिवसासारखे दिवस
नवसासायासांनी मिळाल्यासारखे वाटतात
आणि नवस पुरता झाला म्हणून
निघूनही जातात

माझ्या श्रद्धेच्या गुंफेत
ध्यानमग्न मी एकटाच बसलेला असतो

□

## कुठून निघालो काहीही न ठरवता ?

कुठून निघालो काहीही न ठरवता ?
कुठे निघालो ? आपण कुठे आहोत ?

तुझ्या स्मिताचा पहारा मला जागवतो
पण तुरुंग फोडून माझे मन
भरकटून येते, तेव्हा मी कुठे असतो ?
कुठे चाललेला असतो ? कुठून निघालेला असतो ?

अस्तित्वाची सीमारेषा तू ठरवतेस
सहअस्तित्वाची ओळख आणि नोळख
समजावून देतेस, तेव्हा तुझ्या आनंदातील अधिकार
मला टोचतो, माझ्या क्षुद्र अस्तित्वाला डागण्या देतो

माझी क्षुद्रता तू मला समजावून देतेस
तुझी क्षुद्रता तू पूर्वीच स्वीकारलेली असतेस
पण ज्या महानतेचे आपण अंश आहोत
त्या महानतेत मिसळून जायलाही नकार देतेस

व्यापारी खटाऱ्याबरोबर ओढले जाणारे
जनावर प्रत्येकी असतो आपण
माझ्या डोळ्यांना तुझ्या डोळ्याचे झापड
असते, तुझ्या डोळ्यांना माझ्या ... ... ...

( क्षुद्रता समजावून देण्याघेण्यातच का
आपली महानता साठवलेली असते ? )

□

## उदाहरणार्थ मी चाललोय

उदाहरणार्थ मी चाललोय माझ्या दुःखाचा आकार शोधत
सतत हरवणारा आहे म्हणून
पण सतत हरवणारा तो आहे
मग मी त्याला का शोधत चाललो आहे ?

झंझावातातून उमटलेल्या
अनेक निरर्थक कवितांचे घोष
माझ्या कानात घुमत आहेत

निसरड्या वाटेनेच चालण्याचा निर्णय
मनाशी पक्का केल्यावर
सुखरूप परत येण्याचा वायदा का करतोस ?

निसरड्या वाटांचे आकार शोधत मी चाललो आहे
झंझावातातून उमटणाऱ्या प्रत्येक निरर्थक कविता
त्या झाल्या आहेत.

□

## मित्रांनो,

मित्रांनो,
आपण या विश्वात केवळ उत्पन्न झालो नाही
तर आपले विश्वही आपण उत्पन्न केले

खरे तर काय अधिकार होता आपल्याला तसे करण्याचा ?
परिवर्तनाच्या भुकेतून आपण परिवर्तित होत आहोत
हे आपल्याला समजले नाही काय ?

दुसऱ्यांना बदलण्यासाठी आपण बदलत गेलो
दुसऱ्यांना आपणासारिखे करण्यासाठी
आपण त्यांच्यासारिखे होत गेलो

आपण सृष्टीचे नियम बदलू शकलो काय ?
सृष्टीचे नियम बदलण्याची आपल्यातील अंधप्रेरणा
सृष्टीच्या नियमांनीच उत्पन्न केली नव्हती काय ?
आपण गुलामगिरीचा तिरस्कार केला
तेव्हा आपण स्वातंत्र्यवादाचे गुलाम झालो नव्हतो काय ?

मित्रांनो, आपण विश्व बदलले आपल्याबरोबर
आपण विश्व बदलू या आपल्याबरोबर
हे विश्व नष्टही होईल आपल्याबरोबर

□

## ज्या पुलाखाली मी उभा आहे

आकाशातील पांढऱ्या ढगांच्या पुंजक्यांनी
जगाची पार्श्वभूमी बदलून टाकली आहे
फटफटले आहे पण सूर्य कळत नाही
बसमधून कोंडलेले अतृप्त आत्मे
टकामका निसर्गश्री लुटण्याचा
असहाय प्रयत्न करीत असतात
आणि माझे डोळेही झाले आहेत व्याधाप्रमाणे

ज्या पुलाखाली मी उभा आहे
त्या पुलावर आज इतकी शांतता आहे
की माझे मन आक्रंदत आहे

माझ्या मनातील शहरी प्रतिमा ज्या
डोळ्याबाहेर पडत आहेत
त्यांनीच मला गेंगारून टाकले आहे
वास्तवाला हुलकावण्या देऊन ज्या प्रतिमांनी
माझ्या मनात प्रवेश केला
आणि मला मुक्ततेची शपथ घातली
त्याच मला या मुक्त वातावरणातही बांधून टाकत आहेत
माझे अनेक फसलेले आक्रोश
फसलेली बुद्धिगम्य सुभाषिते
फसलेला प्रत्येक मी
फेर धरून माझ्याभोवती नाचत आहेत
पण यातून सुटका नाही

मी बसमध्ये बसलेलो नाही
पण बसमध्ये बसलेल्यांहून माझे दुःख वेगळे नाही
( मलाही कामावर जायचे आहे )
आविष्काराची बांधिलकीच आशयाचं स्वातंत्र्य
गृहीत धरत असेल
तर त्या स्वातंत्र्याचा काय उपयोग ?

या नीरव शांततेत
क्षणभर मला जे दर्शन झाले मोकळेपणाचे
ते स्वातंत्र्यही क्षणिक ठरले

माझ्या माणुसकीमुळे
रस्त्यातील रिक्षावाला गाणे जे गुणगुणत होता –
कोई हमदम ना रहा...
तो एकाकीपणावरच सुखाचा साज चढवीत नव्हता का ?

प्रत्येक नाण्याला दुसरीही बाजू असते
पण बाजारात दुसऱ्याच बाजूवरून
नाण्याची परीक्षा केली जात नाही

□

## माझे तुमच्याशी नाते

माझे तुमच्याशी नाते
जमेल तेवढ्या शब्दांत सांगायचे आहे.
तुम्हाला आठवते ?
तुम्ही माझे मित्र होता
तेव्हा आईबाप मानून मी तुमची पूजा बांधली
तुम्ही माझे भाऊबंद होता
तेव्हा ईश्वर समजून मी तुमचा भक्त झालो
आता तुमच्या माझ्यातील नाते
तसल्या कुठल्याच शब्दांत सांगता येणार नाही.

केवळ दोन समांतर वधस्तंभाप्रमाणे झालो आहोत
तुम्ही आणि मी
फक्त जाणिवेचे फाकलेले क्रूस एकमेकात अडकताना
आपण विश्वबंधुत्वाच्या शपथा घेतो

एकमेकांच्या सिगारधुरांचे लोट एकमेकात मिसळताना
आपण व्यावसायिक करार करतो
चुंबनमग्न ओठांतून सुधेची देवाण घेवाण करताना
आपण प्रीतीचा अर्थ एकमेकाला विचारतो
पण हळूहळू होत असतो आपण
अंतर्बाह्य उदासीन
एकमेकांचा निरोप घेताना
आपण आजवर एकत्र होतो
हेही आपण विसरून जातो
माझे तुमच्याशी नाते सांगताना
विरून जाणाऱ्या शब्दांना
आपण परत बोलावणारही नाही

□

## एका मैफिलीच्या समाप्तीला

आपसात आपण घेतलेल्या ताना आणि हरकती
ज्या आता फक्त मृततारा झाल्या आहेत
एका मैफिलीच्या समाप्तीला अध्यक्ष हवा आहे.

अध्यक्ष तो होता, अरसिक,
एकदाही मान डोलावली नाही त्याने
दादही दिली कुस्तीगीरांना देतात तशी.

‘ ’! , तुझे वक्षचंद्र माझ्या सर्व अमावास्यांना
पुरेसे होते, तुझ्या पावलांवर आता
घट्ट लोखंडी बूट आहेत.

हवाई इष्काच्या दंगलीत सर्वच विमाने बेचिराख झालीत
इंद्रधनुष्यी तान अर्धचंद्राकार होती आणि
तिच्या प्रत्येक टोकाचे पृथ्वीशी नाते होते.

माझ्यासमोर तुझी मूर्ती आता डागाळलेली
नुसत्याच ॲशट्रेवर पडून राहिलेली जळकी सिगार
निदान तिच्या मृत्यूनंतरची सोय निश्चित झाली आहे.

का समीक्षकाप्रमाणे डोळे विस्फारतेस ?
आपल्या जुगलबंदीचा शेवट कुणाच्यातरी पराभवातच
व्हायला हवा का ?

□

## एक पत्र

तसं लिहिण्यासारखं काही फारसं राहिलेलं नाही
किंवा बोलण्यासारखंही

प्रत्येकवेळी विचार करत गेलो की आपण द्रष्टा आहोत
तसेच दृष्यही
आपण आपल्या दृष्यत्वाचे द्रष्टे झाले पाहिजे

तुला उपदेश देण्याचा मला अधिकार नाही
किंवा संदेश देण्याचाही

पण उगाचच वाटते की घडले त्यात
फार काही चुकले असे नाही

कुणाला दुःख देण्याचा माझा हेतू नव्हता
मला आपले वाटत होते की सुखांच्या
फुटक्या विस्कळीत मण्यांची माळसुद्धा
सुखांचीच असते
पण अपेक्षाभंगाने भंगलेल्या माळा
चिरस्थायी होत नाहीत
हे लक्षात आले तेव्हा मी दूर झालो

मला आपली विस्कळित सवय
फुटक्या मण्यांत सुद्धा आकाश पाहण्याची

तुला मानवली नाही म्हणून दूर गेलो

विचित्र मानवसहवासाचा साक्षात्कार
कळायला कठीणच, आरपार जायचे म्हटले
तर अभेद्यच, अपारदर्शी
पलीकडचे काहीच दिसत नाही –
दिसत नव्हते त्या विचित्र मानवसहवासात

सुगंध घेण्याचा अधिकार फुलांना नसतो
माझ्याच सहवासाचा वास मला येऊ शकत नव्हता
कदाचित तुझ्याही सहवासाचा तुला

दूर दूर जावे लागते अशावेळी

दुर्दैव माझे की माझे प्रश्न सामान्य नाहीत
क्षमा मागण्याची मला सवयच नाही
मी फक्त सहानुभूती व्यक्तवू शकतो

तुझ्या विचित्र रागलोभांना मागे टाकून
सहानुभूती – तीही एखाद्या पेयाच्या घनदाट थेंबासारखी
समोर शिंपडून मोकळा होऊ शकतो

हात झटकून टाकण्याची सवय वाईट आहे, मला
मान्य आहे, पण त्या सवयीचा गुलाम आहे

कदाचित मी एक विदूषक होऊ शकतो, पण विदूषक
कुणाचाच नसतो, खुशमस्कऱ्या ‘ कुणाचा तरी ’
पण खुषमस्कऱ्याही होणे मला जमले नाही, जमणार नाही
हास्यास्पदतेचे मला वाईट वाटत नाही

□

22339
दा. क्र. काव्य

REFBK-0022335
REFBK-0022335